# श्री अनुसया माता अग्नी स्तोत्र



# श्री अनुसया माता अग्नी स्तोत्र

( रामरोटी मधील )

लेखक— दिनकरराव ढोले

प्रकाशक - आशिर्वाद प्रकाशन, पारडसिंगा

पांडुरंगजी जैवार, 8007283981

( जुने स्तोत्र )

किंमत १० रु.

॥ श्री अनसुया माता प्रसन्न ॥

## प्रस्तावना

बंधु भगिनींनो,

आपल्या सर्वाच्या अतःकरणात परमेश्वराच्या प्राप्तीची इच्छा आहे. जर तुम्हाला खराखरच परमेश्वराला पाहण्याची इच्छा असेल, तर तुम्ही आपली मर्जी, हेका, दुराग्रह व अहंकार सोडून आपल्या भावविकारात, दृष्टीत, वृत्तीत आचरणात बदल करा. आणि आपला सर्व हवाला मायमवानीवर सोपवून तिच्या मर्जीप्रमाणे, मार्गदर्शनाप्रमाणे तिच्यावर पूर्ण निष्ठा व दृढश्रध्दा ठेवून चिकाटीने नियमपूर्वक तुमचीं उपासना चालु ठेवा. मग तुमच्यावर कसाहि प्रसंग येवो तिला सोडू नका म्हणजे मग मीही तुम्हाला निश्चित सांगतो की माझी विश्वमाता भगवती माऊली, तुमच्या अतरबाह्य मार्गातील सर्व विघ्ने, अडथळे, संकट दुर सारून तुमचे रक्षण व कल्याण करील, मग ती तुम्हाला अंतरबाह्य, स्वातंत्र्य, सौख्य, शांती, स्वास्थ्य, विश्वप्रेम सारे सारेकाही ऐश्वर्य देईल.

सर्वज्ञानविज्ञान प्राप्त होईल परंतू हे सर्वच तुम्हाला तिच्या सहवासापूढे तुच्छ वाटेल. ती तुम्हास परमेश्वराचे, आपल्या खऱ्या आत्मपरमात्म स्वरूपाचे ईश्वरी–परमेश्वरी रूपाचे एकरूपाने, अनंतरूपाने, विश्वरूपाने दर्शन देऊन कृतकृतार्थ करील व 'याच देही याच डोळा जीवनमुक्तीचा सोहळा' पाहण्याचे महद्भाग्य तुम्हास लाभेल. तो सुवर्णदिन घेऊनच संपूर्ण दैवी स्वातंत्र्यांचा सूर्य तिच्या अनुकंपेने तुमच्या जीवनात, या विश्व–मंडळांत उगवेल, उदयास येईल व सर्व जगाला व तुम्हाला आल्हादित करील.

**अनसूया या शब्दाचा व्यपाक मतितार्थ**

अ :– अनादि ज्याचा आदि व अंत नाही.
न :– निर्गुन निराकार ब्रंम्ह
स :– सगून रूपाने प्रणव – (चित्तशक्ती प्रत्येक प्राणीमात्राची अंतर्यामी)
ू :– उकार अर्ध मात्रा, मूळ प्रणव शक्ती
या :– जन्म मृत्यूच्या यातना नष्ट करण्याकरिता परमेष्टी अनसूयेचा अवतार आहे.

**बोला भगवती अनसुया माता की जय ।**

हे स्त्रोत्र लेखकाने मातेसमोर ठेवले असता मातेने स्त्रोत्र अग्नीत टाकले व थोड्यावेळाने मातेने सीध्द करून बाहेर काढले.

आपला
दिनकर



# भगवती अनसुया माता स्तोत्र

श्री गणेशाय नमः श्री सरस्वती मातायनमः
श्री दत्तात्रया नमः श्री शिवायनमः श्री गुरूदेवायनमः

आदि नमो गणाधीशा । सदाशिवा उमाधवा । श्री कृष्णा राघवा । मच्छिंद्रा, गोरखनाथा ।।१।। तसेच नमूनि गजानना । साईनाथा, ताजुदिना, रामकृष्ण ब्रम्हानंदा गुलाबबाबा रिध्दपुरचे ।।२।। हे संत पुंडलिका रतीयाबाबा । तुकारामा एकनाथा । नृहसिंह सरस्वती समर्था । शिंदे बाबा खरे मार्गदर्शक माझे ।।३।। आणि सर्व संत महंतांना । नमूनि करितो प्रार्थना । कि जो हेतू उपजला मना । तो पूर्ण होतो तुमच्या कृपे ।।४।। नमो जगदंबे अनसुये । लक्ष्मी, रेणूके आदि माये । पारडसिंगानिवासिये । तव स्तोत्रासाठी सहाय्य दे ।।५।। माते तू जगाची स्वामिनी । लोकसेवेस्तव जीवन अर्पूनी । दिगंबरी अवस्थेतूनी राहशी बा रात्र दिन ।।६।। माऊले, माझी एक विनंती । ती मान्य करी गं भगवती मी तव दास अज्ञमती । परी दुर लोटू नको गं ।।७।। नाही मी कवी ना ज्ञानी । आहे नुसता अज्ञानी ।

परिभाव उपजला मनी । तुझे स्तोत्र लिहावे ।।८।। तुझ्या साहाय्यावाचूनी । काहीच होणार नाही । शरण येवून तव चरणी । आर्शिवचन मागतो ।।९।। माते तुझा जन्म। झाला असे भक्ते कुळात । रामाजी पिता नाम । माता आणाई पुण्यवान ।।१०।। म्हणती सदा राम राम । होती अति भाग्यवान नमस्कार त्या उभयतां करून। गुणगान मी तव करीतो ।।११।। माऊले, तु बाळपणांत । दाखविल्या लीला अनंत । नाही मी समर्थ। तया पूर्ण वर्णावया ।।१२।। तूज नाही थोर लहान। गरीब श्रीमंत वा अनाथ। करीशी सर्वाचा स्वीकार । काहीही अर्पिल्यावरी ।।१३।। आवडे तुज नारळ । बदाम अन् खारक । भक्त आणताती वारंवार । गोड करूनी घेशी तुं ।।१४।। सदैव ग्रामी फिरशी । स्वच्छता रस्त्यातुनी ठेविशि । केरकचरा उचलशी । टाकशी त्या पलीकडे ।।१५।। तुझे हे निस्वार्थी सेवाव्रत। चालले आहे सदोदित। लोकांस आहे मार्गप्रत । परि त्याचा स्वीकार व्हावा ।।१६।। माऊले, तू कधी चोळी घालून। कधी लांब झगाच नेसून । सदा मोकळे केस सोडून । राहशी बा स्वानंदे ।।१७।। घेसी ललाटी कुंकू लावून। गळ्यामाजी गरसोळ्या घालून। कंकणे हाती पूर्ण भरून। वस्त्र रहित राहशी ।।१८।। कधी तू हसशी आनंदे । कधी तू रडशी आक्रोशे। सदा तूं फिरशी स्वच्छंदे। भासवूनी पिशापरी ।।१९।। माते, तुझे पागलपण । आहे सर्व लोकांस



भूषण । भक्त वासीयांचे उध्दरण । व्हावे तव कृपे।।२०।। आपूली न वाढवी महती। म्हणूनी ऐशी करशी कृती । भूल पडावी सेवकाप्रती । आपुल्या सामर्थ्याची ।।२१।। आम्हा मुलांस कां भूलविते?। असूनी तुझे सामर्थ्य माते।सोडणार नाही तुझ्या पदाते। जे आहेत भाग्य अमुचे।।२२।। बाळ अपराध करिते। परि मांता कां रागवते । हे ध्यानी घेऊनी तुं माते । कृपाप्रसाद देई ग ।।२३।। तव अतर्क्य शक्तिचे दाखले । किती तरी वर्णू ग माऊले । शब्द सामर्थ्य अपुर्ण पडले । परि वर्णितो मी यथामती ।।२४।। एकदा धुणी घेऊन तूं गेली । तैशीच विहीरी माजी पडली । बातमी सर्वत्र पसरली । हाःहाकार जाहला ।।२५।। लोक आले धावूनी । एकोनिया ती बातमी । म्हणती ही विपरीत करणी कैसे काय करावे ।।२६।। काही बघती तुला आंत । तु बैसली होती पाण्यात । परि हालचाल ना यत्किचित । निःस्तब्ध का तू राहीली ।।२७।। मृत्यू नाही निश्चित । ऐसे जाणुनी अंतरात स्मरूनी मग जगदीश । लोक रहाटीला, हासतसे ।।२८।। पाहुनी तव लीला । लोक आश्चर्य करती मना । प्रभाव बघुनी तुझा। परि ओळख नाही अज्ञ जना ।।२९।। माऊले, तु तैशीच एकदा बेंसली होती लेंडी तीरा। तोच साप येऊनी। चावीत होता पायाशी ।।३०।। खा खा तयाला म्हणती। बघूनि तव ती प्रकृति जाणारे येणारे नवल करिती । परि सोडवले नाही

कुणी ।।३१।। कठीण संकटाचे समयी । कुणीच धावून येत नाही । ईश्वरा शिवाय आई। सत्य असे हे अबाधित राही।।३२।। तद्नंतरही तूं काही। उपाय करून घेतला नाही । हवाला ठेवून ईश्वरापायी । निर्धास्त बा राहीली ।।३३।। सर्वा भुती ईश्वरी शक्ती। पहाते तु माऊली। पारी ते तत्व आम्हा। अजूनही उमजले नाही ।।३४।। माते तू होती गुजरी चौकात । संत कैकाडी बाबा आले गावांत । झाली त्यांची दृष्टादृष्ट । आनंद मग जाहला।।३५।। ढग एकही नव्हता आकाशात । परि पाऊस पडला अकस्मात । सर्व लोक झाले आनंदीत । ऐसा प्रभाव तव शक्तिचा ।।३६।। बाबा मग वदले । बघा दिव्य शक्तिचे कोडे । वंदावी मातेची पाऊले । प्रचिती घेण्यासाठी हो ।।३७।। झिगूजी नामे धनगर। दाढ दुखीने झाला बेजार। त्रास होतो वारंवार । म्हणूनी तुज भजतसे।। ३८।। ऐकून तयाचा करूण धावा पाझर तव हृदयी फुटला। धाऊनी गेली त्याच्या दाराला। ऐन मध्य रात्री।।३९।। चौफेर नजर फिरवली । हळुच वाकून भली। कानशीलात थापड दिली । दुःख त्यांचे निवारण्या ।।४०।। अतीव असे ते दुःख । नाहीसे झाले क्षणात। आनंदले मग मनात। धन्य हि माऊली म्हणोनी।।४१।। काय वर्णावी तुझी थोरवी। बहूतेकास नाही कळली । परि विश्वास ठेवावा चरणी । जगी उध्दारण्याते ।। ४२।। बालक रमेश लोहार ।



झाला होता फार बिमार। जेवीत असे वारंवार। काळजी मातापित्याला लागली।।४३।। जाऊनी सकाळचे समयास तू ओढिले त्यांचे पुढचे ताट । मार दिधला फार त्यास । म्हणून तो रडू लागला।।४४।। बालक रमेश बरा झाला मारण्याचा गूण कळून आला । ऐसी आहे मातेची लिला । कळले ऐसे सर्वाशी ।।४५।। नागपूरचे शरद बाळ । दर्शनासाठी आले सत्वर । झाले होते अती जर्जर । अन्नही न घे वदनी ।।४६।। ऐकोनी त्याच्या मातेचा धावा । वदलीस अशी तु तेधवा । आहे हा भाऊबंदकीचा दावा । व्यर्थ शिणवू नकोस ग ।।४७।। आराम होईल याला । जलद प्रत्यय आला । शरद व्यवस्थित झाला । ऐसा प्रभाव माऊलीचा ।।४८।। काशिनाथ हेडाऊ गुरूजीस । जाऊनी दृष्टांत दिधलास । रडून केला आकान्त । सकाळचे समयी ।।४९।। गणेश चतूर्थीचे दिवशी । बोलली उद्देशून गणरायाशी । अहो निश्चित कां बसलासी । विघ्नहर्त्या गणाधिशा ।।५०।। लोकावरीबा संकट आले । नदी नाले तुडुंब भरले जिकडे तिकडे पाणी झाले खेडे पाडे वाहूनी गेले ।।५१।। ऐशी तूं महान अंतर्ज्ञानी । वदशी भूत भविष्य वाणी । किती वर्णू मी तव गुणगाणी । असमर्थ ग मी आहे ।।५२।। विनवीतो मी कर जोडून । घ्या

सिध्द माऊलीचे दर्शन। पार करण्या भवबंधन। विनंती या दासाची ।।५४।। क्षण एक येईल कैसा । देहाचा नाही भरवसा । म्हणूनी पडेल कधी मृत्युचा फासा। करा ध्यास आईचा।।५५।। एकोणविसशे चौसस्ट साली। घटना अकल्पित घडून आली। माऊली जोराने रडू लागली । न थांबे मुळी रडणेच।।५६।। अरेरे दिवा विझून गेला। देशात या अंधार झाला असे म्हणून आकांत केला । ह्या दिवशी माऊलीने।।५७।। अंतर्ज्ञाने नेमके ओळखूण । मातेने केले निवेदन। परि कुणा न आला समजून । मतीतार्थ बोलण्याचा।।५८।। सत्तावीस मे च्या सकाळी। वार्ता अशुभ समजली । जनता हवालदिल झाली । ऐकून बातमी नेहरूची ।।५९।। मालक उपहार गृहाचा । वामनराव येवले ह्याचा । धंदा चालत असे जोराचा । माऊलीच्या कृपेमुळे ।।६०।। एके दिवशी सकाळचे समयी। माऊलीने हॉटेलात जाऊनी। भज्यांची मागणी केली । परि नाही दिलेत हो।।६१।। भजे होते तप्त तेलात। म्हणून नाही दिले मातेस। हात घातला तप्त तेलात । परि फोड ना हातावरी।।६२।। आईच्या शक्तिचे दिव्यत्व। दिसून येई प्रत्यक्ष । अचल असल्या विश्वास। माऊलीच्या चरणावरी।।६३।। तुझया अशा अगणित लिला। नाही मी समर्थ वर्णन्याला। महाकवीच पाहीजे त्याला। न होय कदापी माझ्याने ।।६४।। अंत कळे ना सामान्याप्रति । बघुनी तव



निस्वार्थी कृती । परि ज्ञाते पुरूष ओळखती । शिवशक्ति भगवती म्हणूनीया ।।६५।। विठ्ठलराव दादाजी ढोले। त्या गावचे गृहस्थ भले । त्यांनीच प्रथम ओळखीले । अनसुया माऊलीला।।६६।। पाहुनि मातेची शक्ति।आहे ही प्रत्यक्ष भगवती नैवद्य दररोज पाठविती । अर्पण करण्या आदरे ।।६७।। ते राहात होते नागपूरास। चोरी झाली अकस्मात । येऊनी मातेने स्वप्नात । सर्वच हाल सांगितला।।६८।। अरेरे ! सेवया, सरगुंड्या। तशाच गादी दुलया । चोरांनी सर्वच बा त्या नेल्या । अस्ताव्यस्त वस्तु केल्या ।।६९।। असली सुचना देऊना । माता झाली तेथेच अंतर्धान । काय वर्णावे तिचे महिमान । असमर्थ मी आहे।।७०।। दुसरे दिवशी सकाळी । तार खरोखरच आली । वार्ता सर्व समजली । चोरी झाली म्हणूनीया ।।७१।। विजया दशमीचे दिवशी आलो होतो तव दर्शनाशी । अर्पूणी शमीपत्रांशी । आशिर्वाद मागावा ।। ७२।। हा हेतू धरोनी मानसी। आलो होतो मी तुजपाशी। परी तू कुठेच ना दिसशी। म्हणूनी खिन्न जाहलो।।७३।। जाऊनी माझ्या सदनाशी । बैसली होतीस खांबापाशी । पाहूनी तव कृतीशी । आई मनी आनंदलो।।७४।। भावना भक्तांची जाणूनी। पूर्ण करिते तूं अंतर्ज्ञानानी। सांगितला अनुभव बहूतेकांनी। ऐसी पूर्ण ज्ञानी माऊली।। ७५।। धन्यधन्य ही माऊली । आम्हासाठी अवतीर्ण जाहली । सुवर्ण

संधी लाभली। भक्ता जगी उध्दारण्याते।।७६।। श्री अहेरराव साहेब। होते दुचाकीवर। घडला अद्‌भुत चमत्कार । वर्धा शहरी।।७७।। होते पिवळे लुगडे अंगावरी । तैसाच हिरवा चुडा दोन्ही करी। लुगड्याच्या घड्या खांद्यावरी। घेऊनी फिरत होती माऊली ।।७८।। तत्काळ मातेस ओळखूनी । साहेब थांबले पूढे जाऊनी । आले त्यांचे ह्रदय उचंबळूनी। प्रेमे नमस्कार मग केला।।७९।। उत्सुकता भक्ताची जाणुनी। माऊलीने पूर्ण केली । आपुले प्रागट्य दाखवुनी । माऊली निघुनिया गेली ।।८०।। परमहंस पुंडलिक बाबा । असतात ब्रम्हलीन सदा । उपस्थित होते कार्यक्रमा । परडसिंगा या ग्रामी. ।।८१।। बाबांची मिरवणूक निघाली । आदरे सर्वानी पूजा केली । चौका चौकांतूनी शोभा केली । कमाणी उभारूनी ।।८२।। मिरवणूक पूढे चालू लागली । बाबांचा जयजयकार करूनी । रस्त्यात मातेस पाहूनी । परस्परा ओळखिले ।।८३।। दोन दिवसापासुनी। स्तब्ध बैसली होती माऊली। लोक पूजा करती मनी। का माऊली फिरली नाही हो।।८४।। ऐसे आदरे शब्द काढुनी। लोक पूजा करती यथाविधी सर्वाचाच स्विकार करूनी । स्तब्ध होती माऊली।।८५।। दुसरे दिवशी सायंकाळी । बाबा गेले अकस्मात निघुनी । दहिलाहीचे कार्य टाकुनी । दर्शनार्थी हवालदिल झाले ।।८६।। जाणूनी मातेच्या अधिकारी । कार्य सोपविले तिजवर । म्हणुनी



बाबा गेले शिघ्र । ऐसे लोकांना वाटले ।।८७।। ऐन दहिलाहीचे वेळी । माऊली उपस्थित झाली । स्वहस्ते लाही करूनी । निघूनी गेली माऊली ।।८८।। खाऊली डी. डी.टी. ची भुकटी । तैसेच तेलहीमहाविषारी पचविले त्वा हलाहला परि । ऐसी तु महाशक्ति शाली।।८९।। याचे हेच असावे कारण । शक्तिचे मूळ अधिष्ठान। आहे तुझ्याच पासून परि आम्ही अजान असे ।।९०।। कृष्णरावजी ठाकरे मुंबईला सहलीस गेले । फिराया सायंकाळी निघाले । परि संकट आले ।।९१।। वाहनाची होती विशाल रीघ मोटारी धावती भरधाव। रस्ता ओलांडण्याची घाई फार । म्हणुनी घडला विचित्र प्रकार ।।९२।। वेगाने कार आली भरधाव । मध्येच सांपडले कृष्णराव । म्हणती आता करावे काय?। समजेना काही।।९३।। म्हणूनी काकुळतेने मारली हाक। माऊले अनसुये तूं धाव, माता धाऊनी गेली अकस्मात । संकट निवारण्या ।।९४। पटकन् वरचेवर उचलोनी । दिधले मरगडवारी लोटूनी बघणारे आश्चर्य करती मनी। कैसे हे अद्‌भूत घडले।।९५।। घाबरोनी कृष्णराव पडले । मग औषधोपचार केले । शुध्दिवर येऊनि सांगितले। माऊलीने मज वाचविले।।९६।। जो सर्वस्वी विश्वासला। आणि माऊलीवर भार टाकला । त्याच्या निवारिते आपदा । म्हणूनी त्याला आपला ।।९७।। माझ्या माऊलीची लिला विचित्र । न कळे कुणाला निश्चित ।

परि ज्यांची श्रध्दा असेल निश्चल । त्यालाच प्रत्यतर येतसे । ।।९८।। असे हे पवित्र चरण। लाभेल आम्हा साधने कारण। उपयोग करून घेऊ पूर्ण। अपूल्या आत्मोधारार्थ ।।९९।। भव्य माते तुझी व्याप्ती । सामावली तूं त्रिजगती । चराचरी, सर्वाभूती । व्यापूनिया उरली असे ।।१००।। तुझी आहे ब्रम्हस्थिती । भेदभाव ना तुजप्रती । तुच आमुची गुरूमुर्ती । मार्ग दाखविण्या आम्हागे ।।१०१।। त्रिखंडी वाढावी तुझी किर्ती । तैसाच महिमा यापुढती । ऐसे आहे आमुचिया चित्ती । अभ्युदया साठी भक्तांच्या ।।१०२।। जाणुनी ईश्वरी अंश एकमेव । व्यवहार करशी स्वयंमेव । तुझे बोलणेही अभिनव। अर्थच मुळी समजेना ।।१०३।। तुं काय काय जेवला ?। ऐसा करिशी प्रश्न सर्वांना । परि गुढाहि न उकले कुणाला । संभ्रमात मग पडती ।।१०४।। माऊलें, तूं आहेस निर्विकार। देहभान रहित असुनी थोर। श्रेष्ठ आहे अधिकार। आम्हा सर्वाहुनी तुझा।।१०५।। कधि तू धरिते रूप मनोहर। कधी सौम्य साचार कधी बनते अती कठोर। दधिचीच्या वज्राहूनी।।१०६।। तुझ्या नाना स्वरूपा पाहून । भांबावून जाते माझे मन। लिला दाखविते अभिनव। चिंध्या चिरकुट्या घेऊनी।।१०७।। सर्व सिध्दि तुझ्या हाती । त्या कौतुक भक्तांचे पाहती । निष्ठावंत आहेत किती । माऊलीचे खरेखुरे ।।१०८।। जैसी असेल ज्यांची भावना । तैशी त्यांची पुरविशी कामना । याचा



अनुभव भाविकांना । येतसे नित्य प्रत्ययी ।।१०९।। कैसी करावी तुझी भक्ति । की ज्याने मिळेल मुक्ती । याचे ज्ञान नाही चित्ती । म्हणुनी मार्ग दाखवी ।।११०।। नाम जपाची घेऊनी शिदोरी । आलो शरण तव चरणी । उद्धरी मज या भवतारातूनी झडकरीग माऊली ।।१११।। या कलियुगामाझारी नाम जपाचे माहात्म्य भारी । काही विचार करा हो अंतरी । आत्मोधारार्थ।।११२।। म्हणूनी नामजप करावा । रात्रदिवस आठवावा । आपुला उध्दार करून घ्यावा। याच देही ।।११३।। मानवदेह नाही मिळत । सदैव सांगताती साधुसंत । म्हणूनी भिनवा नाम चित्तात । सदसर्वदा ।।११४।। मायबापहो, विनंती तुम्हास । जोडुनिया दोन्ही हात । स्मरोनी आपूल्या माऊलीस । नामजप करावा ।।११५।। हाची मार्ग आहे सोपा । परि मातेस मुळी विसरू नका । घेऊनी तिचाच सहारा । मार्ग आक्रमण करा ।।११६।। माते माझी गाऱ्हाणी । घालू कुणाच्या कानी । मज अन्य नाही कोणी । प्रतिपादन तुज वाचून ।।११७।। तूं माय माझी महासमर्थ । हा धरूनी भावार्थ आलो मी उध्दारार्थ। तुजशी माऊले ।।११८।। नृसिंह सरस्वती महाराज । केवळ दयेचे सागर । कारूण्य मुर्ती खरोखर । त्यांनीच केले मज मार्गदर्शन।।११९।। त्यांच्याच आशीर्वादाने । स्तोत्र वर्णून पूर्ण झाले । मजसारख्या--पामराने । न होय कदापी हो।।१२०।। माझे गुरू

शिंदे महाराज । त्यांनीच लाविला हातभार । म्हणूनी स्तोत्र झाले तयार । माझे काहीच नाही हो ।।१२१।। आईच्या कृपाप्रसदाविण । कसे झाले असते स्तोत्र वर्णून। मी आहे नुसता निमित्त प्रमाण । तिनेच लिहून घेतले ।।१२२।। माते, तूं मम माय भवानी । शरण आलो तव चरणी । तव इच्छे प्रमाणे करूणी । मार्गदर्शन मज करावे ।।१२३।। तू माझी माय माऊली खास । मी आहे तव अज्ञ पाडस । म्हणूनी माझा हक्क खास । आई, तुझ्या पायावरी ।।१२४।। बालकांत असेल काही दूषण । ते मातेस होईल का भूषण। म्हणूनी माझे सर्व दुर्गुण । नाहीसे कर कृपाकटाक्षे ।।१२५।। आत तूं कर एवढे तरी । मज नित आठवू दे श्रीहरी । यावीण आशा नाही दुसरी । जगी आता उद्धरण्याते ।।१२६।। मी आहे संसारी संबद्ध । बदलवी माझे प्रारब्द । तू आहेस स्वयं समृद्ध । या भवसागरी ।।१२७।। अनूकूल पारब्दा वाचुनी । काहीच होणार नाही । धाव पाव माझे आई । जगी मज उध्दरण्याते ।।१२८।। जो श्रध्दा ठेवील चरणी । पावेल उत्तम गती निर्वाणी । माऊली आशीर्वच देऊनी दे । अंती देईल सद्गती ।।१२९।। माते तव कृपेकरून । सदा आनंदित राहो मन । घडू दे सर्वदा शिवस्मरण । तैसीच संगत सज्जनाची ।।१३०।। नित्य केल्या स्तोत्र पठण । संततीहिनास संतान । होईल निश्चय करून । विश्वास अचल असल्यावरी ।।१३१



हे स्तोत्र आहे अमृत । भाविक अशा लोकाप्रत विश्वास ठेविल्या निश्चित । पावेल त्यांना माऊली ।।१३२।। स्नान संध्या करून । नित्य करावे स्तोत्र पठन । शुध्द भाव ठेवूनी । आपुल्या मानसी ।।१३३।। मातेची प्रतिमा ठेवूनी समोरी । स्तोत्र पठण करावे शुक्रवारी । विश्वास ठेऊनी अत्यादरे । शरण जावे माऊलीला ।।१३४।। तेही अशक्य असल्यास । प्रत्येक एकादशी वा पौर्णिमेस । वाचून पहा सती अनसुया स्तोत्र । अनसुया स्तोत्र । अनुभव घेऊन पहा हो ।।१३५।। वारी पारडसिंग्याची करा । एकदा चरण मातेचे धरा । दर्शनाची जलदी करा । उध्दरूण जाण्याकारणे ।।१३६।। हा दास दिनकर अनाथ । नाही त्यास कुणाची साथ । लागली मज तीव्र आस । शिवस्वरूप बघण्याची ।।१३७।। मी आहे तव अंकीत । शिघ्र भेटू दे मज भगवंत । मम शरीराचा होऊ दे अंत । याच मार्गी माऊली ।।१३८।। ॐ नमः शिवाय चा मंत्र । चालू दे मम हृदयी सर्वत्र । होऊ दे शरीर पवित्र । शिवरूप होण्याकारणे ।।१३९।। शेवटचा दिवस व्हावा गोड । म्हणूनी विनंती करतो तूज । नामजपातच माझा शेवट । होवो आई तुझ्या कृपे ।।१४०।। करूनी षड्रिपुंचा नाश समुळ । अहंभावना काढूनी निर्मूळ। मग वास तुझा केवळ । राहो निरंतर मम हृदयी ।।१४१।। आपपर भाव न उपजो मनीं। समत्व भावना बाणू दे मनी। आत्मज्योतीचा प्रकाश ब्रम्हांडी। दिसू दे सर्वदा।।१४२।।

आहे इतुकीच इच्छा मनी । ती पूर्ण करी ग भवानी आलो शरण मी तव चरणी । आर्शीर्वच मागतो।।१४३।। आता नाही ऐसे म्हणू नको । दुसऱ्या कडे पाठवू नको । आढेवेढे मुळीच घेऊ नको । मज उध्दरण्याते ।।१४४।। विश्वास ठेवा स्तोत्रा विषयी। सुज्ञ हो आपूल्या मानसी । तर्कवितर्क कुकल्पनेशी । जागा मुळीच देऊ नका ।।१४५।। मातेच्या अंत:प्रेरणेकरून । स्तोत्र केले मी वर्णन । स्तोत्रास आहे मातेचे वरदान । गोड करूनी घ्या हो ।।१४६।। वैशाख वद्य एकादशीस पाचारूनी अनसूया मातेस । जन्मोत्सव करावा खास । बहू आनंदाने माऊलीचा ।।१४७।। ही प्रथा अखंड चालविल्यास । महत्वपूर्ण लाभेल भक्तगणांस प्रत्यय घेऊनी पहा हो खास । विश्वास ठेवूनिया।।१४८।। संपूर्ण स्वातंत्र्य व अभयंदान । देईल माता निश्चये करून । भाव आणि विश्वास ठेऊन । शरण जावे माऊलीला ।।१४९।। माझा अनुभव आहे खास । नाममंत्र हाच उपाय एक एक जाणीव ठेवून चोवीस तास । माऊलीच्या कृपेकारणे ।।१५०।। तिची कृपा असल्यावरी । सर्व गोष्टी मिळेल घरच्याघरी । सद्गुरूही येतील घरी । शिष्याची पात्रता संपादिल्या ।।१५१।। भाग्यवान जो जो असे । त्याचीच तव पदी निष्ठा बसे । मग सद्भाग्य उद्यतसे । अचल श्रध्दा असल्यावरी ।।१५२।। आली आहे ही महापर्वणी । घ्या अपुला उध्दार करूनी संसार काम सावरोनी ।



जावे शरण माऊलीला ।।१५३।। ऐकोणवीसशे सदुसष्ठ साली । ऐसी ही ओव्यांची माला झाली । पवित्र चंद्रभागेच्या तीरी । विजयादशमीचे दिवशी ।।१५४।। असे हे अनसूया माऊलीचे स्तोत्र । वाचोत सर्व भाविक भक्त । उध्वरूनी जाण्यासमस्त । या भवसागरातुन ।।१५५।। ऐसी ही शब्दरूपी पुष्पमाला । अर्पण करितो माते तुला । अभय देऊनी बालकाला । गोड करूनी घेई ग ।।१५६।। यांत असेल काही अधिक ऊणे । ते क्षमा करी मज दयाळूपणे कां की मी आहे तुझे तान्हे । कृपा दृष्टी असू दे।।१५७।। तुझ्याच प्रेरणेने मला । वर्णिता आली अवधी लिला । म्हणूनी माते ही तुझीच तुला । अर्पण करितो माला ग ।।१५८।। आई समाधीस्त झाली 10 जानेवार 1997 ला परंतु दर्शन देतसे समाधीतुन भक्तांना सर्व मनोकामना पुर्ण करीतसे भक्त वस्तला ।।159।। असे हे दास दिनकर लिखित। परमपावनसतीअनसूया स्तोत्र ।सर्वाउद्धरण्या होवो समर्थ । या जगता माजी हो ।।160।। श्री हरिहरार्पणमस्तु ।।

पुंडलीक वरदा हरी विठ्ठल
सिताकांत स्मरण जय जय राम
पार्वतीपते हर हर महादेव ।
भगवती अनसूया माता की जय ।
"श्री जगदंबा अनसूया मातार्पणस्तु ।। शुभं भवतु ।।"

# दररोज होणाऱ्या दरबारातील आरत्या व प्रार्थना

## आरती-१

अनसूया आई भवानी देवी । आदी शक्ती तु जननी ।
अती प्रेमाने करुनी आरती । मस्तक ठेवीतो मी चरणी।।ध्रु।।

दिससी वेडी असती भोळी । महान शक्ती तुज जवळी ।
येतो प्रत्यय तव भक्तांना । संकट त्यांचे तु टाळी ।।
कुठेही राहीशी ग्रामी फिरशी । परी नसे तुज भान मुळी ।
आत्म स्वरूपी, तल्लीन असुनी । ब्रम्हनंद उंचबळी ।।१।।

अनसूयामाता नामे जपता । कालीकाल ही थरथराती ।
तव नामाचा महीमा गाता । असंख्य पापे दूर होती ।।
अती श्रध्देने घेऊनी दर्शन । असाध्य रोगी बरे होती ।
ऐसा महीमा तुझ्या कृपेचा । वर्णू माऊले मी किती ।।२।।
भक्त तुझे जे धावा करीती । त्यांच्यासाठी धावूनी जाशी।
अवघ्या चिंता निवारूनी । संकट मुक्त मग करीशी ।।
दिन दयाळे, भक्त वत्सले, माय माऊले अनसूये ।
पापी जनही उध्दारताती । केवळ तुझीया कृपेमुळे ।।३।।

चिंध्या चिरकुट्याा करी घेऊनी पीशापरी तु भासवीशी ।
भुत भविष्य कथन करूनी निज भक्तांना वाचवीशी ।।
बाळा दिनू हा नम्र होऊनी आला शरण तव चरणी ।
ओवाळीती तुला आरती । पारडसिंगा निवासीनी ।।४।।

# श्री सती अनसूया & अष्टोतर नामावली

## मातेचे ध्यान करून अक्षता फुले वाहावें

१) ॐ अनसूयामाताय नमः
२) ॐ आदिशक्तिये नमः
३) ॐ महादेव्यै नमः
४) ॐ अंबीकायै नमः
५) ॐ परमेश्वर्याय नमः
६) ॐ सर्व भुतेश्वर्याय नमः
७) ॐ ब्रम्हांडधारीणें नमः
८) ॐ महारूपाय नमः
९) ॐ महापायाय नमः
१०) ॐ लोकरक्षीण्ये नमः
११) ॐ दुर्गाय नमः
१२) ॐ दुर्गापाराये नमः
१३) ॐ भक्तचिंतामणीमे नमः
१४) ॐ सर्वसीध्दीप्रदाये नमः
१५) ॐ महालक्ष्मीये नमः
१६) ॐ योगीणे नमः
१७) ॐ महाकालाय नमः
१८) ॐ महासरस्वते नमः
१९) ॐ सर्वमुर्तिस्वरूपीं नमः
२०) ॐ वेदांतय नमः
२१) ॐ भागवते नमः
२२) ॐ नारायणें नमः
२३) ॐ शंखचक्रगदाधारीण्येन नमः
२४) ॐ मनोयोगीणे नमः
२५) ॐ सर्व ज्योती स्वरूपीये नमः
२६) ॐ नमःपरमकल्याणें नमः
२७) ॐ अव्यक्ये नमः
२८) ॐ अनंताये नमः
२९) ॐ चंद्रमंडलवासीने नमः
३०) ॐ परमानंदाय:
३१) ॐ अपराजीतामे नमः
३२) ॐ शिवाय नमः
३३) ॐ ज्ञानमुर्तिय नमः
३४) ॐ दारीद्रहारीणें नमः
३५) ॐ शिवतेजो मुखात नमः
३६) ॐ केशविभुतिया नमः
३७) ॐ सर्वरक्षणाय नमः
३८) ॐ लक्ष्मीनारायनाय नमः
३९) ॐ शिवशक्तिये नमः
४०) ॐ कृष्णराममारूत्यादीपाय नमः
४१) ॐ पारडसिंगावासिये नमः
४२) ॐ भूतभविष्यम्दाय चर्जीताय नमः
४३) ॐ सर्वधाराय नमः
४४) ॐ सत्यधर्मपरायणाम नमः
४५) ॐ सत्यतत्व बोधाकाय नमः
४६) ॐ अज्ञानज्ञान गोचगाय नमः
४७) ॐ रामकृष्णाये गोविंदाये नमः
४८) ॐ ब्रम्हाविष्णुमहेश्वराय नमः

४९) ॐ साईं गजानन ताजुद्दीन नमः
५०) ॐ ब्रम्हचर्यतपश्चर्यादीसुब्रहाय नमः
५१) ॐ अनाथनाथ दिनबंधवे नमः
५२) ॐ पुण्य श्रवणकीर्तनाय नमः
५३) ॐ कामदीष्य वरीध्दसीने नमः
५४) ॐ भक्तावन प्रतीज्ञाय नमः
५५) ॐ भक्तावन समर्थाय नमः
५६) ॐ धनमांगल्य प्रदाय नमः
५७) ॐ भुक्तीमुक्ती स्वर्गापवर्गदाय नमः
५८) ॐ अन्तर्यामीने नमः
५९) ॐ साच्छिदात्मेंन नमः
६०) ॐ नित्यायनन्दाय नमः
६१) ॐ भवतांनामातृधातृपीतामहाय नमः
६२) ॐ भक्ता भव प्रदाय नमः
६३) ॐ भक्त पराधीनाथ नमः
६४) ॐ नांगतवत्सलाय नमः
६५) ॐ भक्ती शक्ती प्रदाय नमः
६६) ॐ ये बहुरूदविश्वमूर्तये नमः
६७) ॐ संसारसर्वददु:खक्षणभराय नमः
६८) ॐ सर्व मंडालकराय नमः
७०) ॐ सर्व लोक नमस्कराय नमः
७१) ॐ दीन बंधवे नमः
७२) ॐ दिगांबराय नमः
७३) ॐ वाकसीध्दीये नमः
७४) ॐ नारायनीये नमः
७५) ॐ सनातनाव नमः
७६) ॐ अंबीका नाथय नमः
७७) ॐ भक्त वत्सलाय नमः
७८) ॐ वदामप्रिये नमः
७९) ॐ कालकालाय नमः
८०) ॐ कृपाविधये नमः
८१) ॐ अनेकात्मने नमः
८२) ॐ अनेकात्मवे नमः
८३) ॐ विद्यालक्ष्मीचे नमः
८४) ॐ सर्वलक्ष्मीप्रदान नमः
८५) ॐ रूद्रस्वरूपीये नमः
८६) ॐ पुष्पहाय नमः
८७) ॐ पुष्पकिर्तीये नमः
८८) ॐ विशालक्षाय नमः
८९) ॐ आत्मज्योतीषाय नमः
९०) ॐ सत्पुरूषाय नमः
९१) ॐ पांडुरंगाय नमः
९२) ॐ हरये नमः
९३) ॐ परमात्माये नमः
९४) ॐ पुष्पापचारीणे नमः
९५) ॐ सती अनसूयानंदाय नमः
९६) ॐ आनाई वत्यलाये नमः
९७) ॐ वासुदेवकीनंदनाय नमः
९८) ॐ सर्वग्रह रूपीर्णे नमः
९९) ॐ सौभाग्यकंनधारीणे नमः
१००) ॐ सर्वाभिष्टप्रदाय नमः
१०१) ॐ सर्वानिविहि स्थितात नमः
१०२) ॐ सर्वास्तधारीनें नमः
१०३) ॐ विश्वरूपीणे नाराणाय नमः
१०४) ॐ सत्यधर्मशांती प्रेमालयाय नमः
१०५) ॐ समत्ससन्मार्ग स्थापनाय
१०६) ॐ सितारामचंद्राभ्यां नमः
१०७) ॐ परब्रम्ह सद्गुरू अनसूया माताय नमः
१०८) ॐ अनादी ब्रम्हचारीणे नमः

ॐ अनंत कोटी ब्रम्हान्ड नायक, राजाधिराज, योगीराज परमगुरू, परमेष्टी, परमानंद स्वरुपीनी, अखंडीत लक्ष्मी, अलंकृत विराजीत, राज राजेश्वरी पारडसिंगा निवासीनी, महाशक्ती सद्गुरु अनुसया माता की जय ।

**याप्रमाणेवाहून झाल्यावर अननाषोत्तर – शतसंख्या के अमुक द्रव्य समर्पनेने भगवती अनसूया प्रियाताम । असे म्हणून हात जोडून । जे द्रव्य समर्पण केले असेल त्याचा उच्चार**

हे पुस्तक, भजनावली, आरतीसंग्रह व ग्रंथ मंदीर कडून
1 नंबर दुकान मध्ये उपलब्ध आहे.

---

ॐ अनंत कोटी ब्रम्हान्ड नायक, राजाधीराज, योगीराज परम्गुरु, परमेष्ठी, परमानंद स्वरुपीनी, अखंडीत लक्ष्मी, अलंकृत विराजीत, राज राजेश्वरी पारडसिंगा निवासीनी,महाशक्ती सद्गुरु अनुसया माता की जय।

---

टिप:— पोर्णिमेला हे पुस्तक आपन वाचावे व ५ पुस्तके वाटावी.

:: आशिर्वाद ::

# श्री सती अनुसया माता पुजा साहित्य व फोटो दुकान, पारडसिंगा

आमचे येथे मातेचे संपूर्ण पूजा साहित्य, स्टुडिओचे ओरीजनल फोटो, कॅसेट, सी.डी. स्टीकर, लॉकेट, अंगठी, किचैन,व सर्व प्रकारचे पुस्तके योग्य दरात मिळेल. तरी सेवेची संधी द्यावी हि विनंती.

## आमचे प्रकाशने

१. लहान स्त्रोत्र व भजनावली २. मोठे स्त्रोत्र

३. लहान आरती ४. संपूर्ण आरती संग्रह

५. मोठा २१ अध्यायी ग्रंथ ६. दिल्ली यात्रा

( मातेचे चमत्कार व अनुभव पाठवावे)

**सहयोग : मुकेश व हर्षल जैवार**

।। मंदिरातील उत्सव ।।

5 ते 11 मे मातेचा जन्म सप्ताह पौणिमेला यात्रा, व नवरात्र, प्रत्येक पौणिमेला पालखी संपूर्ण गावातून फिरत असते. (2) पुण्यतिथी महोत्सव पौष 2

**आशिर्वाद**

पांडुरंग आर. जैवार

मंदीर कडून दुकान नं. ६

**आईचा आशिर्वाद**

दुकान सौ. मीनाताई पां. जैवार

मंदीर कडून दुकान नं. १